# चहाटळकी

शिरीष कणेकर

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**चहाटळकी**
शिरीष कणेकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
शिरीष कणेकर
ए-३४, भाटिया बिल्डिंग,
ले. दिलीप गुप्ते मार्ग,
माहीम, मुंबई- ४०० ०१६

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

विनोद आवडणाऱ्या टवाळाचा
अधिक खट्याळ भाऊ चहाटळ
व
नाठाळ बहीण खिल्ली यांना
दोन्ही हात जोडून...

# आपकी अदालत

अदृश्य चोपदाराचा आवाज : ११ एप्रिल १९९३ पासून आज सूर्यषष्टी रोजी ११ सप्टेंबर १९९४ पर्यंत शिरीष कणेकर यांची 'चहाटळकी' हे सदर 'रविवार लोकसत्ता' तून सलग ७५ आठवडे चालवले. ते विनोदी असावे, असा संशय घ्यायला वाव आहे; मात्र तसा पुरेसा पुरावा अद्यापि हाती लागलेला नाही. समस्त मराठी वाचक रविवारी 'चहाटळकी'वर तुटून पडतात व सोमवार ते शनिवार रविवारची चातकाप्रमाणे वाट पाहत दिवस मोजतात असा त्यांना भ्रम झाला होता. आता सदर थांबल्यावर त्यांची ही भ्रमिष्टावस्था कमी होईल. (किंवा वाढेल) असा डॉक्टरांचा कयास आहे. शिरीष कणेकर, जनताकी अदालत मे हाजिर होऽऽऽ

**सुस्वरूप युवती :** जनताकी तरफसे सवालात का सिलसिला शुरू करेंगे रडत कर्मा. शिरीष कणेकर अपने मुकदमेकी पेहरवी खुद करेंगे. (कारण कुठलाही सुज्ञ वकील इतकी होपलेस केस हातात घेणार नाही.) मुजरीम शिरीष कणेकरांवर पहिला आरोप आहे की, आपल्या सदराचा उपयोग त्यांनी वैयक्तिक हेवेदावे व आकस साधण्यासाठी केला.

**रडत कर्मा** : कणेकरजी, तुम्ही म्हणे तुमच्या शत्रूंची व नावडत्या माणसांची एक यादीच बनविली होती व ओळीने एकेकाला ठेचून काढीत होतात.

**शिरीष कणेकर** : पतिव्रतेवर छिनालपणाचा आरोप होतोय. वैयक्तिक हेवेदावे आणि आकस? स्तंभातून ज्यांचे वारंवार उल्लेख आले त्या शरद पवारांपासून विठ्ठलराव गाडगीळापर्यंत, भप्पी लाहिरीपासून रवी शास्त्रीपर्यंत, पु. ल.-सुनीताबाईंपासून सुरेश भटांपर्यंत अनेकांशी माझी साधी तोंडओळखही नाही. मी त्यांना एकदाही भेटलेलो नाही. शिवाजी महाराज व शेक्सपियर यांचेही उल्लेख येऊन गेलेत. तुम्हाला कदाचित खोटं वाटेल; पण मी त्यांना भेटलेलो नाही.

(रेकॉर्डेड खोटा हशा) आणखी एक गोष्ट. वैयक्तिक हेव्यादाव्यांना वाहिलेले सदर संपादक एवढा प्रदीर्घ काळ कसे चालू ठेवतील?

**रडत कर्मा** : संपादकांना वश करून घेणारी कोणती जादू तुमच्याकडे आहे तेच आम्हाला जाणून घ्यायचंय.

**शिरीष कणेकर** : कै. र. ना. लाटे, विद्याधर गोखले, माधव गडकरी व आता डॉ. अरुण टिकेकर या चार भिन्न प्रकृतीच्या संपादकांच्या कारकीर्दीत मी सातत्याने लिखाण केले. लेखणीची सोडून अन्य काही जादू दोन तपांहून अधिक काळ सारख्याच परिणामकारकतेने चालू शकत असल्यास ती जाणून घ्यायला मलाही आवडेल.

**सुस्वरूप युवती** : शिरीष कणेकरांवर दुसरा आरोप आहे की, थट्टा-मस्करी, टिंगल-टवाळी करताना त्यांनी कोणीचाही मुलाहिजा ठेवला नाही.

**रडत कर्मा** : ज्यांची कुरापत काढायची, खिल्ली उडवायची तो माणूस जेवढा मोठा तेवढा तुम्हाला जास्त चेव यायचा म्हणे.

**शिरीष कणेकर** : हा लहान, हा मोठा असा पंक्तिभेद न करणे व कोणाचाही मुलाहिजा न ठेवणे हेच माझ्या मते या खेळाचे नियम आहेत. मोठ्यांपासून कटाक्षाने दूर राहायचे व निर्बल, बचावहीन छोट्यांना विनोदाच्या जात्यात भरडून काढायचे हा शुद्ध भेकडपणा होय. मी माणसं निवडून टर उडविली नाही तर टर उडविण्याजोग्या गोष्टी आढळल्या तेव्हा ती माणसं कोण आहेत, किती मोठी आहेत याचा विचार करण्याची मला गरज भासली नाही. शरद पवारांवरील एका टिप्पणीबाबत क्रोधित होऊन एका वाचकाने म्हटले की, अमुक एक विधान म्हणजे पवारांची खिल्ली आहे हे कोणीही मान्य करील. हो, आहेच खिल्ली. पुढे मग? पवारांची खिल्ली म्हणजे कोणाला जगबुडी का वाटावी? अरे, प्रसंगी प्रत्यक्ष देवाचीही थट्टा करायला आपण कमी करीत नाही. (वाचा: श्रेष्ठ विनोदकार कै. चिं. वि. जोशी यांचे 'ओसाडवाडीचे देव') पवार हे देवापेक्षाही मोठे असे प्रस्तुत पत्रलेखकाचे मत असल्यास माझी मुळीच हरकत नाही; परंतु इतरांचे तसेच मत हवे असा त्याचा दुराग्रह असल्यास ते शांततापूर्ण सहजीवनाच्या व लोकशाही संकेताच्या कल्पनेत बसत नाही. वाटल्यास शरदरावांना विचारा.

**रडत कर्मा** : इथेही तुम्ही चान्स सोडत नाही. (रेकॉर्डेड खोटा हशा)

**एक प्रेक्षक** : (कणेकरांनी बसवलेला) : तुमची अशी खिल्ली उडविलेली तुम्ही खिलाडूपणे घ्याल का?

**शिरीष कणेकर** : घ्यायला हवी. थोडंफार नाव असलेल्या प्रत्येकाने किमान खेळकरपणे खिल्लीला सामोरे जायला हवे, असे मी हिरीरीने म्हणत आलोय. त्याला मला स्वत:ला जागायलाच हवे. प्रत्यक्षात मी कसा रिॲक्ट होईन, हे पाहणे मनोरंजक ठरावे.

**रडत कर्मा** : ती सुपारी आम्ही तुम्हालाच देतो.

**शिरीष कणेकर** : मी घेतो. (शाहरूख खानप्रमाणे गालाला खळी पाडून हसण्याचा प्रयत्न करतात; पण प्रत्यक्षात रडल्यासारखे म्हणजे नेहमीसारखेच दिसतात.)

**सुस्वरूप युवती** : शिरीष कणेकरांच्या तथाकथित रेशमी चिमट्यांनी अनेक माणसं दुखावली गेली.

**रडत कर्मा** : पंचाहत्तर आठवड्यात तुम्ही किमान शंभरएक शत्रू निर्माण केलेत, असं म्हणू या का?

**शिरीष कणेकर** : म्हणा की! आकडा खूपच जास्त होतोय व शत्रू हा शब्दही फाजिल स्ट्राँग आहे. माणसं नाराज होण्याचं म्हणाल, तर या प्रकारच्या लेखनात ही रिस्क गृहीत धरलेली आहे. प्रसन्न आणि दर्जेदार 'ठणठणपाळ'मुळे काही माणसं दुखावली नव्हती? मराठी माणसाला खिल्ली, रेवडी, टिंगल अतिप्रिय आहे; पण ती दुसऱ्याची. हे लोण शेजाऱ्याच्या दारापर्यंतच येऊन थांबलंय तोवर तो मिटक्या मारीत एन्जॉय करतो. त्याच्यापर्यंत किंवा त्याच्या एखाद्या लाडक्यापर्यंत ही टर येऊन पोहोचली की, सहसा तो खवळून उठतो. मग 'पुन्हा रवी शास्त्रीचं नाव घ्याल तरं तंगडं तोडून टाकीन.' अशी प्रेमपत्रे येतात. एका आडनाव न लावणाऱ्या बाईंचा उल्लेख मी 'बिनआडनावाच्या' असा केल्याने स्टोव्हप्रमाणे भडकून त्यांनी खरमरीत पत्र पाठवले व त्यात 'परमेश्वर मला सद्‌बुद्धी देवो!' अशी प्रार्थना केली. त्यांना नेमका कशाचा राग आला हे विचार करूनही मला कळू शकले नाही. मला परमेश्वराने सद्‌बुद्धी दिल्याने त्यांना आडनाव कसे फुटणार आहे हेही मला कळले नाही. अजूनही त्या बिनआडनावाच्या आहेत. त्याअर्थी परमेश्वराने मला अद्यापि सद्‌बुद्धी दिली नसावी.

**रडत कर्मा** : थोडक्यात, माणसं दुखावली तर तुम्हाला पर्वा नाही.

**शिरीष कणेकर** : काही थोड्यांची नाही. इतरांची नक्कीच आहे. एखाद्याची एखाद्या गोष्टीवरून थोडी गंमत, मस्करी, टवाळी केली म्हणजे त्याचं संपूर्ण कर्तृत्व नाकारलं असं कोणी का मानावं? 'पान खाऊन खाऊन श्री. ना. पेंडशांची जीभ इतकी चरड झाली असणार की, त्यांची शिटी वाजणारच नाही,' या एका निरुपद्रवी कोपरखळीमुळे या ज्येष्ठ मराठी सारस्वताची उत्तुंग प्रतिभा, लेखनभांडार कवडीमोलाचे ठरविण्याचे अश्लाघ्य प्रयत्न होत नसतात. विनोदाच्या बारीकशा फुंकरीमुळे उडून जाण्याइतक्या या तालेवार शब्दप्रभूंच्या पगड्या लेच्यापेच्या नाहीत हे त्यांच्या चाहत्यांना कोण सांगणार? वि. आ. बुवांची मी माझ्या मते निर्विष थट्टा केली होती. त्यामुळे त्यांची शंभर पुस्तके प्रसिद्ध झालीत, ही वस्तुस्थिती लपत नाही. दहा पुस्तके होता होता माझी दमछाक झाली. शंभर म्हणजे खायचं काम नाही. एवढी पुस्तके काढायला प्रकाशक पुढे येतात याचाच अर्थ त्यांना वाचक आहेत, हे उघड आहे; पण एक कोपरखळी मारल्यानंतर पुढील संभाव्य गैरसमज टाळण्यासाठी हे सगळे स्पष्टीकरण द्यायचं ठरविलं तर, कुटमुटिया किंवा मणियारचं गाइड होईल, 'चहाटळकी' हा आठशे शब्दात बसवायचा स्तंभ नव्हे.

**रडत कर्मा** : ज्यांची तुमच्या मते तुम्ही निर्विष थट्टा केलीत त्यांची प्रतिक्रिया काय होती?

**शिरीष कणेकर** : काही कल्पना नाही बुवा. माझा जनसंपर्क कमी असल्याने कदाचित संबंधितांच्या प्रतिक्रिया थेट माझ्याकडे आल्या नसाव्यात. शिवाय 'निर्विष थट्टा' असं आपण म्हणतो अशी काही गोष्ट खरोखरच अस्तित्वात आहे का याविषयी माझ्या मनात शंका आहे. कारण तुमचा दुखावण्याचा यत्किंचितही हेतू नसतानाही समोरचा दुखावला जाऊ शकतो. तुमच्या मनात काहीही किल्मिष नसले तरी विनोदाच्या नावाखाली तुम्ही केलेले विधान संबंधितापुरते मोरपीस न ठरता बाण ठरत असले तर ती थट्टा निर्मळ, निर्विष, निरुपद्रवी कशी? ज्याला मी शालजोडीतले मारले होते अशा एका नट मित्राला मी मनापासून विचारले, ''तुला राग आला नाही, तू येऊ दिला नाहीस की, आलेला दिसू दिला नाहीस?'' खिल्लीवजा विनोद ही एक तारेवरची कसरत आहे. सत्याच्या

आसपास न येणारे तुम्ही एखादे विधान केलेत (उदा. माहित्येय सुनील गावसकरला काय बॅटिंग यायची ते!) तर तो ना विनोद, ना गंमत, ना काहीही. उलट कटू सत्याच्या तुम्ही फार जवळ गेलात, तर खेळकरपणा न होता दुसऱ्याच्या जखमेवर चोच मारल्यासारखं होतं. 'फलाण्याची बायको त्याला सोडून गेलीय. आता बसला असेल दारूत दु:ख बुडवीत.' हा विनोद, खिल्ली, थट्टा काहीही होऊ शकत नाही. लिहिण्याच्या ओघात माझ्या हातून एकदोनदा कमरेखाली वार केला गेलाय व त्याबद्दल मी स्वत:ला अपराधी मानतो.

**रडत कर्मा** : एकदोनदाच? (रेकॉर्डेड खोटा हशा)

**शिरीष कणेकर** : होय, एकदोनदाच. खरं म्हणजे एकदाच. नाव घेऊन सांगू शकेन; पण तसे करणे म्हणजे कोणाच्या लक्षात आलं नसेल तर मुद्दाम लक्षात आणून दिल्यासारखं होईल.

**रडत कर्मा** : पुस्तकाएवढं मटेरिअल व्हावं म्हणून एवढा प्रदीर्घ काळ तुम्ही सदर लिहीत होतात काय?

**शिरीष कणेकर** : लिहिण्यासारखं माझ्याकडे बरंच होतं व वाचण्यासारखं बऱ्याच वाचकांना बराच काळ त्यात बरंच आढळत होतं म्हणून लिहीत होतो. एनी ऑब्जेक्शन?

**रडत कर्मा** : नो ऑब्जेक्शन. अन्याय सहन करायची आम्हाला सवय झालीय. (रेकॉर्डेड खोटा हशा) सदरात नसलेले व अन्य ठिकाणी लिहिलेले काही लेखही तुम्ही पुस्तकात घेतलेत म्हणे?

**शिरीष कणेकर** : हो, घेतलेत; पण माझं काहीतरी जीवनरहस्य शोधून काढल्यागत का विचारताय? विनोदाची 'मोनोटोनी' भंग करण्यासाठी व विविधता आणण्यासाठी अन्य तीन लेखांचा समजून समावेश केलाय.

**सुस्वरूप युवती** : शिरीष कणेकरांवर आरोप आहे की, त्यांचा विनोद जीवघेणा असतो.

**रडत कर्मा** : कणेकरजी, तुमच्या मते खिल्ली म्हणजे विनोद. फुलस्टॉप.

**शिरीष कणेकर** : मुळीच नाही. खिल्लीविरहित विनोदाचे अनेक नमुने मी 'चहाटळकी'त दाखवून देईन. ज्यात कोणाचाही उल्लेख नाही असेही लेख आहेत.

**रडत कर्मा** : फक्त ते आम्हाला दिसलेले नाहीत. (रेकॉर्डेड खोटा हशा) थिल्लरपणाला काटशह देण्यासाठी मध्येच तुम्ही एकदा गंभीर लेख लिहिण्याचा प्रयत्न केला काय?

**शिरीष कणेकर** : प्रयत्न नाही केला, लिहिला. तोही माझ्या मनाचा एक कप्पा आहे म्हणून लिहिला. कसला शह आणि काटशह? पुढे मागे गंभीर ललित लेखनही करीन.

**रडत कर्मा** : पंचाहत्तर 'चहाटळकी'तला सर्वात सरस विनोद. (रेकॉर्डेड खोटा हशा) 'चहाटळकी' संपली म्हणून आम्ही सुटकेचा नि:श्वास टाकावा काय?

**शिरीष कणेकर** : टाका बाबांनो; पण 'चहाटळकी' ही वृत्ती आहे. ती कायमची घरी बसणार नाही. आज ना उद्या उफाळून वर येणारच.

✦✦✦